# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ०३/०५/२०१८**

## १) फसवणुक :-

**वजिराबाद :- सन २००९ पासुन ते** आजपावेतो मैत्रेय ऑफिस सन्मान कॉम्लेक्स शिवाजी पुतळा वजिराबाद, नांदेड येथे यातील आरोपीतांनी संगनमत करुन मैत्रेय नावाची कंपनी तयार करुन नांदेड शहरातील व जिल्हयातील व्यक्ती कडुन पैशाची गुतंवणूक करुन त्यांचे नावे पॉलीशी काढुन घेऊन त्यांना नफयाचे अमिष दाखवुन फसवणूक केली, वगैरे **फिर्यादी मीनाक्षी चांदु कांबळे, वय ३५ वर्षे रा.स्नेह नगर पोलीस कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे.वनिराबाद** गुरनं ९५/२०१८ कलम ४२०, ४०६, १२० (ब), ३४, भादवी व ३, ४, ५, महाराष्ट्र ठेविदाराचे हित.सं.अधि अन्वये गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/नाईकवाडे, मो.क्रं. ०२४६२-२३६५००** हे करीत आहेत.

## २)गॅस सिलेंण्डर अवैधरित्या बाळगुन मिळून आले :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक ०२.०५.२०१८ रोजी १९.०० वा. चे सुमारास, ढवळे कॉर्नर वाईन शॉपीचे बाजुला सिडको, नांदेड, यातील नमुद **आरोपीने** विनापरवाना बेकायदेशिररित्या शासनाच्या दरापेक्षा जास्त दराने एक इंण्डेन कंपनीचे गॅस सिलेंन्डर रिकामे व एक भरलेले,एक सिंगल गॅस शेगडी व रेग्युलेटर असा एकुण ७,६००/- रुपयाचा माल स्वतःचे फायदया करिता चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करित असतांना मिळुण आला. वगैरे **फिर्यादी पोनि/सोनाजी सुर्यभान आम्ले, ने.पो.स्टे.नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पो.स्टे.नांदेड ग्रामीण** गुरनं १५८/२०१८ कलम ३,७ जिवनावश्यक वस्तुचा कायदाअन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/कदम मॅडम, मो.क्र. ०२४६२-२२६३७३** हे करीत आहेत.

## ३)कल्याण नावाचा जुगार खेळतांना मिळुण आला :-

**किनवट :-** दिनांक ०२.०५.२०१८ रोजी चे १७.१० वा. चे सुमारारास बसस्थानक जवळील अदित्य मोबाईल गॅलरी समोर सार्वजनिक रोडवर, किनवट जि.नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांकडुन पैसे घेवुन कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी १,२००/- रुपये व एक एल.जी.मोबाईल अंदाजे किंमत १,५००/- रुपये असा एकुण २,७००/- रुपयाचा माल व जुगाराचे साहित्यसह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/गणपती दत्तु चित्ते, पो.स्टे.किनवट** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.किनवट** गुरन. ८५/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/७४६ नामदेव लक्ष्मणराव खूणे, मो.क्र. ८३०८२९२२०७** हे करीत आहेत.

## ४) गळफास घेवुन आकस्मात मृत्यु :-

**कंधार :-** दिनांक २७.०४.२०१८ रोजी चे ०८.०० ते दि.०२.०५.२०१८ चे १०.३० वा. चे दरम्यान नवनाथ विठ्ठल सोनकांबळे यांचे शेतात कल्लाळी शिवार, ता.कंधार जि.नांदेड येथे, यातील **मयत नामे कैलास पुडंलीक काचेबोईनवाड, वय २२ वर्षे रा.बल्लाळी, ता.कंधार जि.नांदेड** हा दिनांक २७.०४.२०१८ चे ०८.०० वा. चे सुमारास स्वतःचे लग्न पत्रिका वाटपासाठी गेला व तो परत न आल्याने त्याचा शोध घेतला असता तो नमुद ठिकाणी झाडाला गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार बालाजी सटवा काचेबोईनवाड, वय ५० वर्षे व्यवसाय शेती रा.बल्लाळी, ता.कंधार जि.नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.कंधार** आ.मृ.२०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास सपोउपनि/मुळीक, मो.क्र. ७७२२०११११९१** हे करीत आहेत.


**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४